जा.क्र. रासाप्रपक/कृशिप्र/१३२३/मकृशिसंपपुणे/जागा वाटप/१५९६ दि. २६ जुलै,२०२३

# परिपत्रक

**विषयः- पदवी प्रवेश प्रक्रिया २०२३-२४**
**कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय व कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील रूपांतरीत कृषी महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करणेबाबत.**

कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. पंदेवि-१३१६ / प्र.क्र.११५ / ७-अे, दि.१३/०७/२०२३ व शासन निर्णय क्र. मफुवि-१४२३ / प्र.क्र.१५३ / ७-अे, दि.२६/७/२०२३ अन्वये खालील शासकीय व कायमस्वरूपी विना अनुदानित रूपांतरीत कृषी महाविद्यालयांना मान्यता देण्यात आलेली आहे. सदर महाविद्यालयांचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| महा-विद्यालयाचा सांकेतांक क्रमांक | महाविद्यालयाचे नाव व पत्ता, ई-मेल पत्ता | एकूण वार्षिक शुल्क रूपये | संपर्क अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक | वसतीगृह सुविधा (मुले/मुली) |
|---|---|---|---|---|---|
| ११३१४ | भाऊसाहेब फुंडकर कृषी महाविद्यालय, कृषी तंत्र विद्यालय, धाड रोड, सागवन, बुलढाणा ४४३००१ (शासकीय) email-smjadhao77@gmail.com | प्रवेश माहिती पुस्तिके-तील मुद्दा क्र.१८ प्रमाणे | डॉ. एस. एम. जाधव | ९८५०३७३७६४ | नाही |
| ११३१५ | वृंदावन कृषी महाविद्यालय, चंदनापुरी घाट, गुंजाळवाडी ता.संगमनेर जि.अहमदनगर email-vrindavanagriculture@gmail.com | ७०,००० | श्री. बी. ई. रंधे | ९७६३२३४७४९<br>९९२१५२१५७८ | आहे (मर्यादित) |

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षामधील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित वेळापत्रकानुसार दि. २०/०७/२०२३ पर्यंत प्रवेश अर्ज दाखल करण्याची मुदत होती. मात्र प्रवेश माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. ३.१० अनुसार तक्रार नोंदणीच्या अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच दि.२७/०७/२०२३ पर्यंत महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम (विकल्प) अद्ययावत करण्याची तरतूद आहे.

यास्तव दि. २०/०७/२०२३ पर्यंत प्रवेश अर्ज दाखल केलेल्या सर्व पात्र उमेदवारांना नव्याने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांचा प्राधान्यक्रमामध्ये समावेश करण्याची सुविधा उमेदवारांच्या लॉग-इनद्वारे दि. २७/०७/२०२३ पर्यंत उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, चंदनापुरी घाट, गुंजाळवाडी पठार, ता. संगमनेर, जि. अहमदनगर (सांकेतांक क्र. १८२६४) या महाविद्यालयाच्या रूपांतराने वृंदावन कृषी महाविद्यालय, चंदनापुरी घाट, गुंजाळवाडी ता.संगमनेर जि.अहमदनगर (सांकेतांक क्र. ११३१५) हे महाविद्यालय सुरु होत असल्याने उमेदवारांनी सांकेतांक क्र. १८२६४ हया महाविद्यालयाचा प्राधान्यक्रम दिलेला असल्यास तो रद्द करण्यात येत आहे.

वरील सांकेतांक क्र. ११३१५ हया नवीन महाविद्यालयांस संस्थास्तरीय कोटयातील जागा (अंशतः किंवा पूर्णतः) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करावयाच्या असल्यास त्यांनी दि.२७/७/२०२३ पर्यंत कृषी परिषद व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षास ई-मेलद्वारे कळविण्याचे सूचित करण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी याबाबतची नोंद घ्यावी.

**आयुक्त**
**राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष**